


# समकालीन भारतीय राजकारण : महात्मा गांधी

संपादक

डॉ.रमेश रामराव बैनवाड (पाटील)

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist Parbhani



# समकालीन भारतीय राजकारण :
# महात्मा गांधी

संपादक

डॉ.रमेश रामराव बैनवाड (पाटील)

Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# समकालीन भारतीय राजकारण : महात्मा गांधी

ISBN No. 978-93-80899-08-4

संपादक :
डॉ.रमेश रामराव बैनवाड (पाटील)

प्रकाशन :
३० जानेवारी २०१७
©प्राचार्य, नूतन महाविद्यालय, सेलू. जि. परभणी.

प्रकाशक :
आदित्य पब्लिकेशन्स
७३, वरदानंद संकुल, अशोकनगर, नांदेड.

मुखपृष्ठ :
सतीश कुलकर्णी

मुद्रक :
मयूर प्रिंटर्स
पार्थ संकुल, कैलासनगर,
नांदेड - ४३१६०५.

मूल्य :
रु. ३००

या पुस्तकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक, प्रकाशक सहमतच असतील असे नाही.

२५) **महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य विषयक विचारांची प्रासंगिकता : एक विश्लेषणात्मक अध्ययन**/ममता मधुकरराव देशमुख
२६) **गांधीजीच्या सामाजिक व राजकीय विचारधारेचे महत्व Importance of Gandhian Socio- Political Ideology**/इंगोले अशोक मारोती
२७) **भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीजीच्या धोरणांची भूमिका**/प्रा.शेरे के.बि.
२८) **गांधीजींचे सामाजिक तत्वज्ञान**/गणेश मारोती कचरे
२९) **महात्मा गांधी आणि अस्पृश्यता निवारण**/खंदारे एन. व्ही.
३०) **जनआंदोलनाची प्रभावी साधने - असहकार चळवळ व सविनय कायदेभंग**/पल्लेवार के. डी.
३१) **गांधींजीचे सामाजिक, धार्मिक, राजकीय विचारांचे महत्त्व**/ पांडे भगवान सुखदेव
३२) **महात्मा गांधींचे स्त्री उद्धाराचे कार्य** /रासवे बालासाहेब मच्छिंद्र
३३) **महात्मा गांधी आणि ग्रामीण भारत** / प्रा. मोगल अनंत, प्रा.उगले सुरेश
३४) **म. गांधीजींचे सामाजिक आणि राजकीय विचारांचे सद्यस्थितीत महत्त्व** / सचिन प्रकाशराव देशमुख
३५) **गांधींजींचा सर्वोदयी समाज** /शारदा विजयकुमार सोळंके
३६) **महात्मा गांधींजीचे पंचायतराज विषयक विचार**/जाधव श्रीराम दामला
३७) **महात्मा गांधी आणि ग्रामीण भारत**/विठ्ठल सोनाजी शिंदे
३८) **सत्य आणि अहिंसा गांधीवादाचे मुलाधार**/विवेक सिध्दार्थ ढवळे
३९) **गांधी आणि सत्याग्रह**/पोले जयराम बालाजी
४०) **महात्मा गांधी यांचे स्त्रीवादी विचार**/डॉ.भागवत डी.आर., डॉ.संतोष कोल्हे
४१) **गांधींजींच्या स्वप्नातील ग्रामीण भारत आणि सद्यस्थिती**/ विश्वास दामोधर तळेकर
४२) **महात्मा गांधीजींचे राजकीय व शैक्षणिक तत्वज्ञान**/ वसीम अक्रम जाकेर बेग
४३) **गांधीजींच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य : एक दृष्टिक्षेप**/मस्के समृध्दी जर्नाधन
४४) **महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता व महत्व**/प्रा. भाऊसाहेब आवटे
४५) **म.गांधीचे ग्रामीण विकासाबाबतचे विचार एक अभ्यास**/प्रा.हूरगुळे एन.आर.
४६) **ग्रामीण भारत आणि महात्मा गांधी**/प्रा.डॉ.रामदास डी. मुक्टे
४७) **पंचायत राज संस्था आणि महात्मा गांधीचे कार्य**/प्रा. डॉ. रमाकांत तिडके
४८) **गांधीजींचा राजकीय धर्म**/डॉ. आर. बी. शेजुळ
४९) **महात्मा गांधी यांच्या विचाराची २१ व्या शतकातील प्रासंगिकता- एक अभ्यास**/प्रा. डॉ. सुखनंदन ढाले
५०) **महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता**/प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव
५१) **महात्मा गांधी आर्थिक विचार**/प्रा.डॉ एम. डी. कच्छवे
५२) **महात्मा गांधी व जातीय निवाडा**/प्रा.डॉ.अंभूरे एस.डी.
५३) **मं. गांधीचा राज्यविषयक दृष्टीकोण**/प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.

# म. गांधींचा राज्यविषयक दृष्टीकोण

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.**
राज्यशास्त्र विभाग,
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ.

प्रस्तावना:-

स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि न्याय ही चार मानवी मुल्य आहेत. मानवाला माणूस म्हणून जीवन जगण्यासाठी यांची आवश्यकता असते. म्हणून लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये यांना आधारभूत मानले आहे. भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. भारताच्या राजकीय व्यवस्थेच्या अनुषंशाने ज्या भारतीय राजकीय विचारवंतांनी चिंतन, केले आहे. त्यामध्ये म.गांधी यांचा समावेश होतो.

भारताची राजकीय व्यवस्था कशी असली याबाबत म.गांधी स्वराज्याची संकल्पना मांडतात. लोकांची उपक्रमशीलता, क्रियाप्रवणता आणि निर्णयक्षमता यांना वाव देणारी ग्राम स्वराज्याची मांडणी म.गांधीनी केली आहे. ज्यामध्ये न्याय, नितिमत्ता, अहिंसा, सत्याग्रह, सर्वोदय यांना महत्वाचे स्थान आहे.

म.गांधीच्या अगोदरच्या आधुनिक भारतीय चिंतकांनी त्यांच्या इतका सर्वपर्शी विचार केलेला दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा शेती असे कोणतेही क्षेत्र असो ज्याबद्दल म.गांधीजीनी आपले विचार मांडले नाहीत असे नाही तर वैयक्तिक आत्मशांतीपासून ते विश्वशांतीपर्यंत व खंडयापासून ते विश्वापर्यंत मुलगामी चिंतन गांधीनी केले आहे. सर्वस्पर्शी, सर्वलक्ष्मी व सर्वहितकारण विश्वमानवदर्शन देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या जीवन विचारातून दिला आहे. गांधीनी राजकारणाचे अध्यात्मीकरण किंवा नैतिकीकरण केले असे सुध्दा म्हटल्या जाते. म्हणून गांधीवाद हा मूलतः धार्मिक मानवतावाद आहे. नीतिशास्त्र, समाजरचना व राजनीती यांना आधारभूत अशी नैतिक दृष्टी या गांधीवादात स्वीकारलेली आहे.

## राज्यविषयक विविध दृष्टीकोण:-

राज्य ही मानवी जीवनातील अतिशय अशी महत्वाची संकल्पना आहे. जो राज्याशिवाय मनुष्य राहतो तो एक तर देव असला पाहिजे किंवा जंगली पशु असे अरिस्टॉटल म्हणतो की, राज्य मनूष्याच्या विकासासाठी निर्माण झाले आणि ते त्याच्या कल्याणासाठी टिकुन आहे. याशिवाय मॅकिव्हली, हॉब्ज, लॉक, रुसो यासारख्या पाश्चिमात्य राजकीय विचारवंतांनी राज्याला आवश्यक मानले आहे. सेंट ऑगस्टीन, सेंट थॉमस, यांनी राज्याला दैवी मानले पाश्चात्य राजकीय विचारात केवळ कार्ल मार्क्स राज्याला अनावश्यक मानतो. तो राज्याला शोषणाचे साधन मानतो. म्हणुनच तो राज्यविहिन समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

प्राचीन काळापासून राज्याची आवश्यकता विचारवंतांनी मान्य केले आहे. आजही मानवी जीवनात राज्याचे स्थान सर्वश्रेष्ठच आहे. मानवाला कोणताही विकास करावयाचा झाला असला तरी राज्याशिवाय तो करु शकत नाही. राज्याने आपले पारंपारिक पोलिस स्वरुप सोडुन कल्याणकारी राज्याचे स्वरुप धारण केले आहे. राज्याचे हे कल्याणकारी स्वरुप आज सर्व मान्य झाले आहे.

## म. गांधी व राज्य :-

म.गांधींचा राज्यविषयक दृष्टिकोण दोन संदर्भात अविष्कृत झालेला दिसून येतो. यामध्ये पहिला दृष्टिकोण म्हणजे ब्रिटिश राजसत्तेविरुध्दचा त्यांचा स्वतंत्र्य लढा. ज्यामध्ये म.गांधी कोट्यावधी भारतीय जनतेला गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी संघर्ष करताना ते दिसतात तर गांधींचा राज्यविषयक दुसरा महत्वाचा दृष्टीकोन म्हणजे त्यांची स्वराज्याची किंवा अराज्याची संकल्पना होय. राज्यसत्ता व राज्यसंस्था अस्तित्वातच असू नये अशी त्यांची अ-राज्यवादी भूमिका त्यांची होती. शक्तीवर, सत्तेवर आणि हिंसाचारावर आधारिक असलेल्या या निरंकुश राजसत्तेला त्यांनी विरोध केला आहे. यामुळेच राज्याला त्यांनी ऱ्हदयशून्य यंत्र असे म्हटले आहे. त्याचबरोबर ते म्हणतात, राज्यसंस्था म्हणजे अत्यंत तीव्र आणि संघटित स्वरुपाच्या हिंसाचाराचे प्रतिक आहे.

राज्यसंस्था पाशवी शक्तीचे व अधिसत्तेचे प्रतिक असल्याने त्या शक्तीचा गैरवार तिच्या हातून होणे स्वाभाविक आहे असे म.गांधी म्हणतात. म.गांधींचा अ-

राज्यवादी दृष्टिकोण आधिक विस्ताराने मांडताना आचार्य विनोबा भावे म्हणतात, सध्याच्या तथाकथित लोकनिर्वाचित शासनप्रणालीमध्ये निर्माण करण्यात आलेल्या निवडणूका, राजकीयपक्ष, लष्कर, पोलिसबळ व कायदे या सर्व संस्था सामान्य माणसांवर सत्ता गाजविण्यासाठीच निर्माण झाल्या आहेत. म्हणून राज्यसंस्था ही अनेक अनिष्टांचे मूळे आहे. राज्यसंस्था मूळात कृत्रिम आहे. म्हणून राज्यसंस्था योग्यही नाही आणि आवश्यकही नाही.

**म.गांधी व स्वराज्य :-**

राजकीय तत्वज्ञानाच्या क्षेत्रात विशुध्द आदर्शवादाची कास धरणारे गांधीजी प्रत्यक्ष कार्याच्या प्रसंगी आदर्शवादाचा मेळ फलितवादाशी घालतात. स्वराज्य ही आदर्शप्रत जाण्याची एक पायरी आहे. इंग्रजीत ज्याला सेकंड बेस्ट म्हणतात तशी स्वराज्य संकल्पना आहे. आदर्शप्रत जाणारा सर्वात जवळचा मार्ग स्वराज्य आहे असे गांधींना वाटते. निर्मलकुमार बोस याबाबत म्हणतात, अराज्यवादी अवस्था आदर्श खरी पण मानवी देहधर्माची मर्यादा सुटत नाही हे लक्षात घेतले तर प्रत्यक्षात कोणत्याही समाजात काही शासन हे असणारच, आणि शासन आहे तोपर्यंत त्यावर अंकुश ठेवण्यासाठी लोकशाही संघटित करण्याची गरज राहिलच म्हणूनच स्वराज्य एक व्यवहार्थ तडजोड आहे.

म.गांधी स्वराज्य संकल्पने विषयी म्हणतात, माझ्या स्वप्नातले स्वराज्य हे गरिबांसाठीचे स्वराज्य आहे. आयुष्याच्या गरजा राजघराण्यातील धनिक वर्गातील लोकांतइतक्याच सामान्य लोकांनाही भोगत याव्यात, ते असेही म्हणतात. स्वराज्याला पूर्ण तेव्हाच म्हणता येईल जेव्हा ते राजपुत्राइतकेच शेतकऱ्यांसाठीही असेल श्रीमंत जमिनदारांइतकेच मातीत राबणाऱ्या कुळासाठीही असेल आचार्य विनोबा भावे म.गांधीजीच्या स्वराज्याचा अर्थ स्पष्ट करताना म्हणतात, स्वराज्य म्हणजे परकीय राज्यसत्तेतून सुटका एवढ्यापुरताच मर्यादित अर्थ नाही तर कोणत्याही स्वरुपाच्या बाह्य नियंत्रणापासून मुक्तता व आत्मनियमनाच्या कायद्याचे पालन होय. नैतिक अस्तित्वाची स्वायतता किंवा प्रत्येक व्यक्तीचे स्वतःवर असलेले नैतिक नियमन म्हणजे स्वराज्य.

**निष्कर्ष:-**

म.गांधींना राज्य विरोधी किंवा अराज्यवादी विचारवंत म्हणून ओळखल्या

जाते. ब्रिटीश ढंगाच्या संसदीय शासन प्रणालीला त्यांनी विरोध करुन ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. ज्यात भारतातील लहान लहान खेडयांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविणे, ज्यामध्ये सर्वांच्या गरजा भागल्या जातील. परंतू म.गांधींनी अपेक्षित असलेली ग्रामस्वराज्याची संकल्पना आजही अपूर्ण अशीच आहे. ना राज्य नष्ट झाले ना स्वराज्य आले ना ग्रामस्वराज्य स्थापन झाले. म.गांधींना अभिप्रेत असलेला शासनमुक्त समाज अद्यापही अशक्य आहे असेच वाटते.

याउलट आज व्यक्ती परावलंबी बनत चालला आहे. व्यक्तींची आत्मनिर्भरता नष्ट होवून तो अधिकाधिक राज्यावर अवलंबून आहे. राज्याची आवश्यकता दिवसेंदिवस व्यक्तिला अधिक वाटत आहे. म्हणून राज्य आधिक बळकट किंवा पोलादी बनत आहे.

**संदर्भः-**

१) गांधी विचार मिमांसा – बाळासाहेब भारदे
२) सिलेक्शन फ्रॉम गांधी – निर्मलकुमार बोस
३) रामराज्य – बुध्ददेव भट्टाचार्य
४) सर्वोदयविचार आणि स्वराज्यशास्त्र – विनोबा भावे
५) मेरी विचारमाया भाग – जयप्रकाश नारायण

■■■

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani